# सीएसआयआर-एनआयओ, बिट्स पिलानी यांच्यात शैक्षणिक करार



**पणजी : कराराप्रसंगी उपस्थित प्रो. सुनीलकुमार सिंग, प्रो. सुमन कुंडू, डी. एम. कुलकर्णी, प्रो. मीनल कौशिक, डॉ. व्ही. व्ही. सनीलकुमार व व्यंकट कृष्णमूर्ती.**

प्रतिनिधी
पणजी

सीएसआयआर-राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था आणि बिट्स पिलानी, के के बिर्ला, गोवा यांच्यादरम्यान परस्पर सामंजस्य करार करण्यात आला. दोन्ही संस्था दरम्यान जीवशास्त्र, रसायनशास्त्र, सागरी उपकरणे, उच्च क्षमतेच्या संगणक क्षेत्रात दीर्घकालीन शैक्षणिक, संशोधन आणि प्रशिक्षण करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

सीएसआयआर-एनआयओचे संचालक प्रो. सुनीलकुमार सिंग, बिट्स पिलानीचे संचालक प्रो. सुमन कुंडू यांनी करारावर स्वाक्षरी केली. याप्रसंगी बिट्स पिलानीचे प्रशासकीय संचालक डी. एम. कुलकर्णी, प्रो. मीनल कौशिक आणि एनआयओचे डॉ. व्ही. व्ही. सनीलकुमार, व्यंकट कृष्णमूर्ती यांची उपस्थिती होती.

या करारामुळे सागरी संशोधनात दोन्ही संस्थांच्या परस्पर सहकार्याने काम केले जाईल. तसेच सागरी संशोधन क्षेत्रातील कौशल्याचा वापर व सामाईकरण दोन्ही संस्थांसाठी सुलभ होईल.